# रामकृष्ण निकेतन - वृध्दाश्रम, शांतिवन

शांतिवन हा झाडाझुडपांनी वेढलेला निसर्गरम्य , स्वच्छ, निर्मळ असा परिसर आहे. अशा या रम्य परिसरात वृध्दाश्रमाची स्थापना नोव्हेंबर १९८६ मध्ये प्रायोगिक तत्वावर दोन खोल्यांमध्ये झाली. पुढे कै. गोविंदरामजी चुलानी यांच्या उदार देणगीतुन स्वयंपूर्ण अशा १० निवासी खोल्या, ऑफिस, जेवणघर, स्वयंपाकघर अशा वृध्दाश्रमाच्या स्वतःच्या वास्तुची निर्मिती मार्च १९९३ मध्ये झाली. या कामी कै. गोविंदरामजी चुलानी यांच्या आर्थिक सहाय्या बरोबरच ट्रस्टी श्री. नितीनभाई खंबाटी व श्री. प्रकाशभाई मोहाडीकर यांची झालेली मदत बहुमोल आहे.

शांतिवनाला तत्वतः वृध्दाश्रमाची संकल्पना मान्य नाही. घर हे घरच असते. घराला दुसरा पर्याय होऊ शकत नाही. त्यामुळे घरापासुन दूर पडणे व वृध्दाश्रमात येऊन रहाणे हे मान्य नसतांनाही काळाची गरज, वृध्दांचे उर्वरीत आयुष्य चांगले मानाचे सन्मानाचे जावे, त्यांचे शारिरीक, मानसिक संवर्धन व्हावे हा हेतू अंगिकारुन २० जणांची सोय असलेला रामकृष्ण निकेतन - वृध्दाश्रम कमी पडु लागला. लोकांना नाही म्हणणे जीवावर येऊ लागले त्यामुळे लायन्स क्लब ऑफ नॉर्थ बॉम्बे यांच्या सहकार्याचा स्विकार केला व जुन २००६ साली आणखी २० जणांची सोय होईल असा स्वयंपूर्ण वृध्दाश्रम तयार झाला. अशाप्रकारे आज रामकृष्ण निकेतन - वृध्दाश्रमात ४० जणांची राहाण्याची सोय आहे.

रामकृष्ण निकेतन - वृध्दाश्रम एक सुखी आनंदी परिवार आहे. घरगुती वातावरण , मधुमेही आजारी वृध्दांच्या समस्या लक्षात घेवून केलेले घरगुती भोजन, सर्व प्रकारचे सण, वृध्दांचे वाढ दिवस, वृध्दांना मिळणारी आस्था प्रेम , आजारपणात त्यांची घेतली जाणारी काळजी या गोष्टी ध्यानात घेता वृध्दाश्रमाचे निवासी वृध्दाश्रमाला "सुखाश्रम " म्हणून संबोधतात. असा गौरव सामाजिक कार्यात आभावानेच मिळतो व रामकृष्ण निकेतनने तो मिळवला आहे.

श्रीमती लिलाताई चव्हाण यांच्या मृत्यूपत्राप्रमाणे त्यांच्या पश्चात त्यांच्या घराच्या विक्रीतून आलेल्या आर्थिक मदतीला मुंबईतील लायन्स क्लब व लायन्स क्लब ऑफ इंटरनॅशनल फाऊंडेशन यांच्या मदतीने वृध्दाश्रमाचे असे स्वतंत्र प्रेक्षागार निर्माण झाले, "बलवंतराय चव्हाण कम्युनिटी हॉल" या नावाने. हॉलमध्ये आज १०० लोकांची बसण्याची व्यवस्था होऊ शकते. वार्षिक स्नेहसंमेलन, वृध्दांचे वाढदिवस, रोजचा योगाचा तास, दिवसभरातील प्रार्थना, पेपर वाचन या बरोबरच वृध्दांचे बैठे खेळ, वर्षभर होणारी विविध शिबीरे, मनोरंजनाचे कार्यक्रम, मिटींग्ज असा विविधांगी कामासाठी हॉलचा उपयोग होतो. या हॉलच्या उभारणीत अन्य देणग्या आणण्यात व तो पूर्ण करुन घेण्यात श्री. नितीनभाई खंबाटी यांचा सिंहाचा वाटा आहे.

वृध्दाश्रमात ज्याच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत व जे निकोप (फिट) आहेत. परावलंबी नाहीत अशांनाा जात, धर्म, लिंग, भाषा हे विचारात न घेता, प्रथम तीन महिन्यांसाठी प्रोबेशनवर घेतले जाते. प्रवेश घेताना रु.१,०००/- प्रवेश फि, रु.२१,०००/- अनामत (जी सोडुन जाताना बिनाव्याज परत दिली जाते) व दरमहा रु.३,०००/- निवास शुल्क (ज्यात जेवणखाण व काही प्रमाणात मेन्टेनन्स येते) भरावे लागतात. स्वतःचा वैयक्तिक खर्च जसे औषधं, खाऊ, कपडा, तेल ज्याचा त्याने करावयाचा असतो. निवासियांची बाहेरील काही कामे जसे बँकेचा व्यवहार, औषधे आणणे, डॉक्टरकडे घेऊन जाणे इत्यादि संस्था करत असते. अल्प काळ येऊन राहु इच्छिणाऱ्या वृध्दाची जागेच्या उपलब्धतेनुसार तात्पुरती सोय केली जाते. कमीत कमी रु.३००/- रोजी आकारुन (वृध्दाश्रमाचे सर्व नियम लागु)

वृध्दत्व, आजार, भिन्नभिन्न विचार, स्वभाव बरोबर घेऊन आलेले निवासी येथील आजुबाजूचे स्वच्छ सुंदर वातावरण, घरगुती जेवण (वृध्दांचे आजार सांभाळुन मानवेल पचेल रुचेल) व आनंदी वातावरणात घरदार विसरतात, आजार नसल्यातच जमा होतात व मुख्यत्वे त्यांच्या तब्येती सुधारतात असे व्यवस्थापक म्हणतात.

शरिराने वृध्दाश्रमात परंतु मनाने घरी असलेल्या वृध्दांच्या भावना ओळखुन अनेक उपक्रम राबविले जातात जसे श्रावणातील जीवतीची पुजा (जी केवळ मुलांचे हित चिंतीते), श्रावणातील सत्यनारायण पूजा, साध्या शुभेच्छा देऊन वाढदिवस साजरा करणे (असा वाढदिवस एखाद्या वृध्दाच्या जीवनात प्रथमच झालेला असतो, एखाद्याच्या आयुष्यात मिळालेल्या अनेक पुरस्कारा सन्माना पेक्षा बहुमोल वाटतो, एखाद्याला वबर्षभरासाठी जगण्याची उमेद देऊन जातो, एखादा पुढच्या वाढदिवसाची वाट पहातो तर एखादा आवर्जून आपल्या येणाऱ्या वाढदिवसाची आठवण करुन देतो),

गुढीपाडवा, दसरा, दिवाळी इत्यादी सण पारंपारीकरीत्या साजरे केले जातात. सणावारी, महाशिवरात्री, आषाढी कार्तिकी एकादशी या दिवशी निवासीयांना मंदीरात घेऊन जाणे,. दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी वार्षिक स्नेहसंमेलन भरवले जाते. सकाळच्या नास्त्या पासून पूर्ण दिवसाच्या कार्यक्रमात निवासियांबरोबर निवासियांचे नातेवाईक दिवाळीचा आनंद उपभोगतात. दिवाळीचा आनंदात निवासी आपल्या नातेवाईकांच्या बरोबर सामील व्हावे हा यामागील हेतु. म्हणुनच वार्षिक स्नेहसंमेलनाची निवासी आतुरतेने वाट पाहत असतात.

आठवड्यातून एक दिवस संस्थेचे मानद डॉ. राजेंद्र पटेल वृध्दाश्रमाला भेट देऊन तपासणी करुन औषधोपचार सुचवितात

कै. व्दारकानाथ लेले(ज्यांचे २०१४ मध्ये निधन झाले) यांनी जुन २००१ मध्ये कै. सौ. प्रतिभा व्दारकानाथ लेले यांच्या स्मरणार्थ वृध्दाश्रमाला रु.५,०००/- ची देणगी देऊन त्याच्या व्याजातुन दरवर्षी १ जुन (पत्नीचा स्मृतीदिन) एक वृध्दाश्रम निवासीयाला पुरस्कार द्यावा अंसे सांगितले होते त्याप्रमाणे ;

| | | | |
|---|---|---|---|
| १) | १-६-१० | श्री. रामचंद्र शंकर पंडित | रु.३०१/- |
| २) | १-६-११ | श्री. रामचंद्र संभाजी प्रभु | रु.३०१/- |
| ३) | १-६-१२ | श्रीमती सुशिला शिवराम गोखले | रु.४०१/- |
| ४) | १-६-१३ | श्रीमती सुनंदा जगताप | रु.४०१/- |
| ५) | १-६-१४ | श्री. स्वामीदास कामत | रु.४०१/- |
| ६) | १-६-१५ | श्री.विद्याधर देशपांडे | रु.४०१/- |

यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

श्रीमती विद्याताई साळवे यांनी दोन कार्यकर्त्यांची राहाण्याची सोय व्हावी म्हणुन आपल्या वैयक्तिक देणगीतुन वृध्दाश्रमाला लागुनच एक जोडघर बांधुन दिले आहे. निवासी, कार्यकर्ते, संचालिका एकमेकांच्या विचाराने चालवित असलेला हा वृध्दाश्रम प्रपंच पाहुन पूर्वीच्या एकत्र कुटुंबाची आठवण येते.

मानद श्रीमती विद्याताई साळवे या १९९६ पासुन वृध्दाश्रमाची संपूर्ण धुरा सांभाळीत आहे. करुणा, प्रेम, जिव्हाळा, शिस्त वेळप्रसंगी कठोर पण तितक्याच प्रेमाने व जिवापासुन तन, मन, धनाने आज ७१ व्या वर्षी काम करत आहेत.

वृध्दाश्रमाची दैनंदिनी :-

१) दिसाची सुरुवात आनंदी, सुंदर, पवित्र व्हावी म्हणुन चहा पूर्वी ओंकार, सगुण निर्गुणाची प्रार्थना व गायत्री मंत्राच्या जपा बरोबरच महामृत्युंजयाचा जप व त्यानंतर चहापान होते.

२) चहापाना नंतर योगा बरोबरच ओंकार व वृध्दांना मानवतील, झेपतील असे सर्वांगसुंचर व्यायाम घेतले जातात.

३) सर्व निवासीयांना खोलीमध्ये स्नानासाठी गरम पाणी दिले जाते.

४) स्नाना पश्चात नास्त्याची वेळ. सर्व प्रकारचा नास्ता केला जातो.खात्यापित्या घरातील वृध्दाश्रमात येणारी ही मंडळी बऱ्याचवेळा घरातील परिस्थितीशी समझोता करुन वृध्दाश्रमात येतात तेव्हा त्यांच्या आवडी निवडी शक्य तितक्या जपल्या जातात व त्यांच्या मागणी प्रमाणे शक्य तर नास्ता करण्याचा प्रयत्न केला जातो.

५) सकाळी ९ ते १२ वैयक्तीकरित्या पूजाअर्चा, ध्यानधारना, पेपर वाचन, फिरणे, गप्पाटप्पा वगैरे.

६) दुपारी १२.३० वा.सहभोजन. भोजनात एक भाजी, कोशींबीर अथवा लोणचे, चटणी, आमटी (आठवड्यातून एक दिवस मोड आलेल्या कडधान्याची आमटी व उसळ) फुलका चपात्या, वाफाळलेला भात (जो जेवणाआधी १५ मिनीटे केला जातो) व ताक ज्याला हवे तितके. विशेष म्हणजे रोज चपातीवर वा वरणभातावर साजुक तुप.

७) दुपारी १ ते ३.३० मोकळा वेळ.

८) दुपारी ४ वा. चहा कॉफी बरोबर बिस्किटे वा अन्य खाऊ दिला जातो.

९) ४ ते ६ संध्याकाळचे फिरणे.

१०) ६.३० नंतर सायंकालीन प्रार्थना ज्यात वेगवेगळी स्तोत्रे व प्रार्थना व आरत्या असतात.

११) ७.३० वा. रात्रीचे भोजन.

भोजना नंतर १ ते १.३० तास एकत्र जमणे, गप्पांच्या ओघात आपल्या जीवनात अनुभवलेला, पाहीलेला प्रसंग सांगणे, सर्वांनी वाचावा असा वृत्तपत्रातील उतारा वाचुन दाखवणे, टी.व्ही.वरुन एक दोन मालिका पाहाणे, पसायदान व अर्ध्या मिनीटाचे मौन. यामागील उद्देश जेवल्या बरोबर झोपू नये व दिवसाच्या सुरुवातीप्रमाणेच, दिवसाचा शेवटही गोड करणे हा आहे.

एक सामाजिक कार्य ज्याला अनंत हस्ते मदत मिळत असते अशा सर्व दात्यांच्या ऋणात राहाणे संस्था आपले कर्तव्य मानते.

सर्वांचे आभार.

0000000